# महाशीर संवर्धनासाठी तीन कलमी कार्यक्रम

**लोणावळा : महाशीर** माशांच्या प्रजातीचे जतन व संवर्धनासाठी टाटा पॉवर कंपनीच्या वतीने 'अ‍ॅक्ट फॉर महाशीर' ही मोहीम हाती घेण्यात आली आहे. जनजागृती करणे, महाशीरप्रेमींना शिक्षण देणे, एकत्र आणत सक्षम करणे असा तीन कलमी कार्यक्रम कंपनीने तयार केला आहे.

भांडूप, मुलुंड व ठाणे परिसरातील नऊ शाळांमधील ४८ विद्यार्थ्यांना क्लब एनर्जीच्या माध्यमातून एकत्र करीत लोणावळ्यातील वलवण धरणाच्या पायथ्याजवळ महाशीर प्रजोत्पादन केंद्रात प्रत्यक्ष भेट व मार्गदर्शन कार्यक्रम झाला. महाशीर माशांचे जीवन, त्यांच्या अस्तित्वाची गरज, ही प्रजाती नष्ट होण्यामागची कारणे, कंपनीकडून सुरु असलेले संवर्धनाचे प्रयत्न यांची माहिती देण्यात आली. केंद्रात महाशीरचे जीवनातील विविध टप्पे, अंड्यांच्या निर्मितीपासून छोटे मासे ते मोठे होईपर्यंतची प्रक्रिया दाखविण्यात आली.

महाशीरच्या प्रजातीचे राष्ट्रीय स्तरावर मोठ्या प्रमाणात संवर्धन व्हावे याकरिता जनआंदोलन उभारण्यासाठी कंपनीने या उपक्रमातून महाशीर प्रेमींना हाक दिली आहे. लोणावळ्यातील केंद्रात अत्याधुनिक तंत्रज्ञान व सखोल संशोधन करून या जातीच्या लाखो माशांची पैदास केली जाते. वर्षाकाठी या केंद्रातून अडीच ते ३ लाख माशांची पैदास करून ते तलावात सोडले जातात. पैदास करणारे हे भारतातील एकमेव केंद्र असल्याचे सांगण्यात आले. (वार्ताहर)